भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय/2017-18/23
एफआयडीडी.एफएलसी.बीसी.क्र.11/12.01.018/2017-18 जुलै 13, 2017

अध्यक्ष/एमडी व सीईओ,
अधिसूचित वाणिज्य बँका
(आरआरबी व लघुवित्त बँकांसह)

महोदय/महोदया,

**एफएलसी (वित्तीय साक्षरता केंद्रे) व ग्रामीण शाखांद्वारे वित्तीय साक्षरता - निधी देण्यामधील मर्यादांमधील सुधारणा, दृक-श्राव्य मजकुर व हँड हेल्ड प्रोजेक्टर्स उपलब्ध करणे.**

कृपया, एफएलसी व बँकांच्या ग्रामीण शाखांसाठी असलेल्या मार्गदर्शक तत्वांच्या धोरणात्मक आढाव्यावरील आमचे परिपत्रक एफआयडीडी.एफएलसी.बीसी.क्र.22/12.01.018/2016-17 दि. मार्च 2, 2017 चा संदर्भ घ्यावा. ह्या परिपत्रकांनुसार, बँकांना सांगण्यात आले होते की, वित्तीय शिबिरे आयोजित करण्यासाठीच्या खर्चाच्या 60% निधी (प्रति शिबिर कमाल रु.15,000/- पर्यंत), वित्तीय समावेशन निधीमधून मिळविण्यासाठी, एफएलसी व ग्रामीण शाखा पात्र आहेत.

(2) पुनरावलोकन केल्यानंतर, एफआयएफ सल्लागार मंडळाने, सुधारणा करुन, बँकांना उपलब्ध असलेला सहाय्यक निधी शिबिराच्या खर्चाच्या 60% व प्रतिशिबिर कमाल रु.5,000/- केला आहे. अधिक माहितीसाठी बँकांनी, नाबार्डने दिलेले परिपत्रक 107/ डीएफआयबीटी -24/2017 दि. मे. 4, 2017 चा संदर्भ घ्यावा.

(3) **दृक-श्राव्य मजकुर व हँड हेल्ड प्रोजेक्टर्स** - वित्तीय साक्षरता शिबिरांची परिणामकारकता वाढविण्यासाठी, वित्तीय जाणीव संदेशावरील दृक-श्राव्य मजकुर दाखविण्यासाठी हँड हेल्ड प्रोजेक्टर्स व पोस्टर्सचा उपयोग करण्यासाठी, एफएलसी व बँकांच्या ग्रामीण शाखांना प्रोत्साहन देण्याचे ठरविण्यात आले आहे. एफ आय एफ कडून हँड हेल्ड प्रोजेक्टर्स व स्पीकर्स साठीचा निधी, हँड हेल्ड प्रोजेक्टर्स व स्पीकर्सच्या (दोन्हीही मिळून) खरेदीच्या किंमतीच्या 50%पर्यंत, प्रति ग्रामीण शाखा/एफएलसी साठी कमाल रु. 5,000/- प्रतिपूर्तीच्या धर्तीवर देण्यात येईल. अशा निधीबाबतच्या अधिक माहितीसाठी बँकांनी, नाबार्डचे परिपत्रक क्र. 105/डीएफआयबीटी-22/2017 दि.मे 4, 2017 चा संदर्भ घ्यावा.

---

वित्तीय समावेशन आणि विकास विभाग, केंद्रीय कार्यालय, 10वा मजला, केंद्रीय कार्यालय भवन, शहिद भगत सिंह मार्ग, पो.बा.सं.10014, मुंबई 400 001 टेलिफोन: 022-22601000 फॅक्स: 91-22-22621011/22619048 ईमेल: cgmincfidd@rbi.org.in

**सावधानतेचा इशारा : बँक खात्याचा तपशील पासवर्ड ह्यासारखी वैय्यक्तिक माहिती मागविण्याबाबत, आरबीआय, कधीही ईमेल्स, एसएमएस पाठवत नाही किंवा फोन ही करत नाही. आरबीआय, कोणाचा निधी ठेवून घेत नाही किंवा देऊ करत नाही. प्रकारच्या कोणत्याही ऑफर्सना प्रतिसाद देऊ नका.**

(4) ह्याशिवाय, वित्तीय क्षेत्रातील नियंत्रकांनी सहाय्य केलेल्या वित्तीय साक्षरता राष्ट्रीय केंद्राने (**एनसीएफई**), आरबीआयने उपलब्ध केलेल्या वित्तीय जाणीव संदेशांवरील **दृक-श्राव्य** तयार केली आहेत. ह्यामधील **पहिल्याच दृक-श्राव्या**मध्ये, केवायसी नॉर्म्स खाली पत्त्याचा पुरावा घोषित करणे, व्यवसाय प्रतिनिधींचा उपयोग, एनईएफटी/आरटीजीएस सारखा इलेक्ट्रॉनिक प्रदान प्रणाली, खोट्या ई मेल्स/कॉल्स व पाँझी योजनांना बळी न पडणे ह्यासारख्या, वित्तीय जाणीव संदेशांचा समावेश आहे. **दुस-या दृक-श्राव्या**मध्ये, भीममार्फत युनिफाईड पेमेंट इंटरफेसचा वापर करण्याची प्रक्रिया समजावून सांगितली असून, **तिस-या दृक-श्राव्या**मध्ये, डिजिटल व रोकड विहीन (कॅशलेस) व्यवहार करण्याचे निरनिराळे मार्ग समजावले आहेत. वित्तीय साक्षरता शिबिरे चालवितांना वरील दृक-श्राव्यांचा वापर करण्यासाठी एफएलसी व ग्रामीण शाखांना सांगण्यात येत आहे.

आपली विश्वासु,

उमा शंकर
(प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक)